# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सुष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

प्रेसनोट क्रमांक - ३६०/२०२४ दिनांक ०१/१०/२०२४

## प्रेस नोट

**“ रिक्षा चोरी करणा-या आरोपीला अटक करुन नायगाव पोलीस ठाण्यातील ०२ गुन्हे उघड करण्यास नायगाव गुन्हे प्रकटिकरण शाखेस यश.”**

नायगाव पोलीस ठाणे हद्दीत दिनांक २७/०९/२०२४ रोजी रात्रौ ०९.४५ ते दिनांक २८/०९/२०२४ रोजी सकाळी ०७.०० फिर्यादी यांचे चूलत भाऊ विपीन सिंग यांनी हसोबानगर रोड नं ०३, नायगाव पुर्व ता. वसई जि. पालघर येथे त्यांच्या राहत्या रुमच्या बाहेर पार्क करुन ठेवलेली वरील वर्णनाची व किंमतीची रिक्षा ही फिर्यादी यांच्या संमतीशिवाय कोणत्या तरी अज्ञात चोरटयाने उघडयावरुन चोरी करुन नेल्याबाबत नायगाव पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीवरुन नायगाव पोलीस ठाणे गुन्हा रजि नं I ४७५/२०२४ भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२) प्रमाणे गुन्हा दाखल होता.

नायगाव पोलीस ठाणे हद्दीत रिक्षा चोरीचे गुन्हे होण्याचे प्रमाणात वाढ होत असल्याने सदर गोष्टीचे गांभीर्य लक्षात घेवून मा. वरिष्ठांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे वेगवेगळी पथके बनवून मिळालेल्या सीसीटीव्ही फुटेज व गुप्त बातमीव्दारामार्फत इसम नामे ब्रिजेश रामकिशन राजभर, वय-१८ वर्षे, रा- रु नं ०२, जीवदानी चाळ, रोड नं ०५, दत्ताआळी रोड, हसोबा मंदीर, नायगाव पुर्व, ता-वसई, जि-पालघर यास ताब्यात घेवून त्यांच्याकडे गुन्हयाच्या अनुषंगाने कौशल्यपुर्ण चौकशी केली असता त्यांनी खालील गुन्हयाची कबुली दिली असुन त्यास सध्या नायगाव पोलीस ठाणे ४७५/२०२४ भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२) प्रमाणे या गुन्हयात अटक करण्यात आली असुन गुन्हयातील चोरीस गेलेले दोन रिक्षा **एकुण २,००,०००/- रुपये** किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करुन खालील ०२ गुन्हे उघडकिस करण्यात यश आले आहे.

| अ.नं. | पोलीस ठाणे | गुन्हा रजि नं व कलम |
|---|---|---|
| १. | नायगाव | I ४७५/२०२४ भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२) प्रमाणे |
| २. | नायगाव | I ४७४/२०२४ भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२) प्रमाणे |

वरील कामगीरी श्री. मधुकर पांण्डेय, पोलीस आयुक्त, श्री. दत्तात्रय शिंदे, अप्पर पोलीस आयुक्त, श्रीमती. पौर्णिमा चौगुले पोलीस उप आयुक्त, परीमंडळ - २ वसई, श्री नवनाथ घोगरे, सहाय्यक पोलीस आयुक्त वसई विभाग, नायगाव पोलीस ठाणे वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री. रमेश भामे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री. सागर टिळेकर यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि/रोशन देवरे, सपोनि/गणेश केकान, पो.अंम. सचिन ओलेकर, सचिन मोहीते, सचिन खंताळ, जयवंत खंडवी, अमर पवार, चेतन ठाकरे, अशोक पाटील, पाडुंरंग महाले यांनी यशस्वीरित्या कामगीरी पार पाडली आहे.

-----ooo-----